# आम्ही पार्लेकर

१९९१ पासून

प्रतिबिंब बदलत्या पार्ल्याचे

वर्ष ३० वे  अंक दुसरा  पृष्ठे ०८  फेब्रुवारी २०२१  www.parlekar.com

Registered-RNI no. 54781/92


या अंकात


पान ०२ कोविड लसीकरण - संभ्रम आणि विश्वास

पान ०४ घरातील समृद्ध अडगळ

पान ०६ देशो देशी

पान ०६ केन्द्रीय अर्थसंकल्प व आपण




पार्ल्यातील गुड मॉर्निंग मुंबई !! चा आवाज RJ ग्रीष्मा बेहेरे

पान ४

## पोलिस - नागरिक संवाद

# गुन्ह्यांना प्रतिबंध व कायद्याचे पालन

आपले विलेपार्ले हा बहुतांशी सुशिक्षित लोकांचा विभाग. त्यामुळेच मोठे गुन्हे येथे क्वचितच होतात. पण पार्ल्यात वयोवृद्ध, ज्येष्ठ नागरिकांचे प्रमाण वाढत चालले आहे. त्यामुळे गुन्हेगारांसाठी हे सहज सावज (soft target) होऊ शकते. मुख्यत: साखळीचोरी, घरफोडी, ऑनलाइन फसवणूक, बनावट पोलीस व महिलांवरील अत्याचार हे या गुन्ह्यांचे स्वरूप. दरवर्षी सात-आठ साखळीचोर्या, दहा ते पंधरा घरफोड्या, पंचवीस ते तीस ऑनलाइन फसवणूकी व दहा पंधरा ठिकाणी बनावट पोलिस बनून ठगवणे होते. यातील ७० ते ८० टक्के गुन्हेगार पकडले जातात. परंतु त्यामुळे होणारा मानसिक त्रास मात्र भोगावाच लागतो. याशिवाय काही ठिकाणी घरगुती किंवा सार्वजनिक स्वरूपात महिलांना त्रास देण्याचाही तक्रारी येतातच.

याचाच विचार करून विलेपार्ले पोलीस ठाण्याकडून दरवर्षी शॉर्टफिल्म, पत्रक, सोशल मीडियाद्वारे जनजागृतीचे उपक्रम राबवले जातात. यावर्षी इन्स्पेक्टर श्री राजेंद्र काणे यांनी 'गुन्ह्यांना प्रतिबंध व कायद्याचे पालन' याविषयी सरळ जनतेत जाऊन हितगुज करायचे ठरवले. चोर्या कशा होतात, साखळीचोरांपासून सावध कसे राहायचे, ऑनलाइन व्यवहारात कशी सावधानता बाळगावी, पोलिसांचे खरे-खोटेपण कसे शोधायचे? यावर चाळी, वस्त्या,सोसायटी मध्ये जाऊन संवाद साधायचा ठरवलं. पार्लेकर मित्र, बीट ऑफिसर व स्थानिक लोक यांच्या सहाय्याने त्यांनी २ जानेवारीपासून ७० कॉर्नर मिटिंग घेतल्या. लोकांच्या तक्रारी समजून घेतल्या.





वस्त्यांमधील बराच महिलावर्ग घरगुती कामांसाठी जातो. त्यांनी स्वत:ची विश्वासाहर्ता व सुरक्षा कशी सांभाळायची ? ते समजावले. लोकांना महिलांचा मान, सुरक्षा ठेवण्यासाठी आवाहन केले. तसेच ट्रॅफिकचे नियम व इतर कायदे पाळण्याची सुरुवात स्वत:पासून केल्यास अपघातांचे प्रमाण रोखण्यास मदत होईल. पार्लेकर मित्रांची मदत आजवर ट्रॅफिक कंट्रोल साठी घेतली जात होती. पण त्यांच्या व्यवसायांचा उपयोग गुन्हा उघडकीस किंवा नियंत्रित ठेवण्यास करण्याचा प्रयत्न आता श्री काणे करणार आहेत.अशा मीटिंगसाठी आम्हाला बोलवा व चळवळीत सहभागी व्हा असे आवाहन इंस्पेक्टर राजेंद्र काणे यांनी केले आहे. ■




Green house RESTAURANT & BAR

KOLHAPURI PAHUNCHAR

Relish a thaali full of Traditional Kolhapuri Cuisine.

Made by
Kolhapuri Cuisine Expert Chef
Loaded Full-Course Thaalis
Pure Veg & Non Veg Options available
Packed in Heat-n-eat Microwavable Plates
Prepared with utmost hygiene & care

Large Thaalis

Mutton @ Rs. 700
Chicken @ Rs. 600
Pure Veg @ Rs. 400
Sea Food @ APC

VISIT NOW!

022 26102593
022 26151104

12 pm-12 am

Premises sanitized with German Liquid-tech

Rao Apts., Nehru Road, Vile Parle East - 400057

★ SPECIAL OFFER ★

Complimentary Wine Glass / Draught Beer With every Thaali
Dine with delightful discounts



इ.सन १९३२ पासून

साठे यांचे **विजय स्टोअर्स**

सहजीवन, ४, श्रध्दानंद रोड, विलेपार्ले (पूर्व), मुंबई ५७.

फोन - +91 91676 00365, 022-2614 6641


## माघी गणपतीच्या मोदकांसाठी तांदुळाची पिठी आणि सुंठवडा

## हलव्याचे सुबक दागिने

चकली भाजणी, कडबोळी भाजणी, सुगंधी तांदुळपीठ, लाडवासाठी जाड बेसन, शेवेचे तयार बेसन, बारीक व जाड रवा, मैदा, चणा डाळ, मुग डाळ, उडीदडाळ, शेंगदाणे, पातळ पोहे, मध्यम पोहे, दगडी पोहे, भाजलेले पोहे, भाजकी डाळ, सुके खोबरे, खोबरे काप, खोबरे कीस, खमण (खोबरे कीस), दळलेली साखर, लीसा साखर, अनारसापीठ (गुळ-साखर), करंजी पुरण, भाजके शेंगदाणे, चकली मसाला, सर्व प्रकारचा सुकामेवा तसेच सुगंधी तेल, केशर, उटणे, शाहीस्नान व उंची अत्तरे इत्यादी. चकली, कडबोळी, गोड शंकरपाळे, शेव, चिवडा, अनारसे, चिरोटे, पाकातले चिरोटे, करंजी, साटाची करंजी, मोतीचूर लाडू, बेसन लाडू, रवा लाडू, रवा-बेसन लाडू, कडकबुंदी लाडू, वेगवेगळ्या प्रकारची बर्फी, पेढे व इतर पदार्थ मिळतील.

स्वच्छ नजरेची ८९ वर्षांची परंपरा











Joglekar's

Try once to experience the difference...

- Fresh Vegetables and Fruits
- Shrikhand, Kharvas, Paneer
- Flours
- Staples
- Coldpress oil and Pure Cow Ghee
- Masalas and Pickles
- Bakery Products
- Kokan Meva- Cashews and Mango pulp
- Frozen Foods
- Namkeen

CALL US AT!

VISIT US AT!

Joglekar's
Sir Phirozshah Mehta Road,
Near Hanuman Mandir, Kunkuwad,
Vile Parle (East), Mumbai 400057.

DELIVERY

- Same day delivery in Vile Parle
- Next day Delivery in other areas

PAYMENT

- Cash on delivery
- Bank transfer
- Phonepay

## संपादकीय

‘आपला भारत देश अमुक अमुक साली जगातील सर्वात तरुण देश होणार आहे’ असे नेहमी ऐकू येते. हें कितपत सत्यात उतरते कोणास ठाऊक पण एक गोष्ट मात्र आपण खात्रीपूर्वक म्हणू शकतो, आणि ती म्हणजे आपले पार्ले मात्र  दिवसेंदिवस वृद्ध होत आहे. पार्ल्यातील अनेक घरातील तरुण आज शिक्षणासाठी, नोकरीनिमित्त  परगावी किंवा परदेशी सुद्धा आहेत. काहीवेळा घर लहान असल्यामुळे मुलांना स्वतंत्र रहायचे असते पण पार्ल्यातील घरांच्या किमती पाहता त्यांना पार्ले सोडण्याशिवाय गत्यंतर नसते. एकूण काय तर पार्ल्याच्या घरी फक्त आजी आजोबाच उरतात. त्यातूनही काही वेळा जोडीदाराचे निधन झाल्यामुळे एकटीच वृद्ध व्यक्ती असते. पंजाब सारख्या सीमाप्रांतामधील घरातील एक तरी व्यक्ती सैन्यात असते असे म्हणतात, त्याच प्रमाणे पार्ल्यातील घरामधील एकतरी व्यक्ति परदेशात असते असे म्हटले तर अतिशयोक्ती ठरू नये.

आज शहरी जीवन अत्यंत गतिमान झाले आहे. रस्त्यांवरील वाहतूक इतकी वाढली आहे की संध्याकाळी रास्ता क्रॉस करणे तरुणांनाही कठीण जाते. भाजी व दैनंदिन गरजेच्या वस्तू आणणे, बँकेचे व्यवहार करणे व त्यासाठी स्वत:ला गर्दीत झोकून देणे हे दिवसेंदिवस वृद्ध लोकांच्या आवाक्याबाहेर चालले आहे. त्यात काही आजारपण आले तर विचारायची सोय नाही. कॉम्पुटर किंवा मोबाईलच्या मदतीने आज सर्व गोष्टी / सेवा आपण घरपोच मागवू शकतो पण त्यासाठी लागणारे मोबाईलचे ज्ञान ज्येष्ठांना नसते. ह्यासाठी नोकरांवर किती विश्वास ठेवायचा हा प्रश्नच आहे. एकटे रहात असल्यामुळे चोरांची टांगती तलवार आहेच. त्यामुळे स्वत:चे घर असूनही, जवळ पैसे असूनही ज्येष्ठांचे आयुष्य पार्ल्यासारख्या सुसंस्कृत उपनगरात खडतरच आहे असे खेदाने म्हणावे लागते.

स्वत:च्या नावापुढे ’सामाजिक’ किंवा ’सेवाभावी’ अशी बिरुदे लावणाऱ्या अनेक संस्था पार्ल्यात आहेत पण त्या मनोरंजनाचे, गाण्याबजावण्याचे  कार्यक्रम साजरे करण्यातच मश्गुल असतात. अश्या कार्यक्रमांना थोडी कात्री लावून वृद्धांचे जगणे सुसह्य करण्यासाठी एखादी सेवा ह्या संस्थांनी सुरु केली तर फक्त ज्येष्ठ नागरिकच नव्हे तर समस्त पार्लेकर अशा संस्थेला दुवा देतील. ही आज पार्ल्याची  सर्वात मोठी सामाजिक गरज आहे !

आम्ही पार्लेकर

संपादक
ज्ञानेश चांदेकर

संपादकीय सहाय्य
रश्मी मावळंकर
पूर्वा कळंत्रे
editorial@parlekar.com

जाहिरात व्यवस्थापन
रोहित जाधव
marketing@parlekar.com

सजावट व मांडणी
विश्वास महाशब्दे

निर्मिती
अनिता चांदेकर

www.facebook.com/AamhiParlekar http://aamhiparlekarblog.wordpress.com
कार्यालय : १, अल्फा, महात्मा गांधी मार्ग, विलेपार्ले (पूर्व), मुंबई-४०००५७.
फोन : २६१२२४७५ / २६१९२३७६ / ई-मेल : info@parlekar.com वेबसाईट www.parlekar.com

## कोविड लसीकरण - संभ्रम आणि विश्वास

२०२० हे वर्ष सर्व जगासाठी अत्यंत भितीदायक आणि क्लेशकारक गेले. अशा प्रकारचा जागतिक रोगसंसर्ग जवळजवळ शंभर वर्षांनी झाला. तरी पण सर्वच वैद्यकीय जगताने व संशोधकांनी अतिशय कष्टाने, चिकाटीने काम करून कोविड १९ला नामोहरम केले. २०२१ हे वर्ष आले ते कोविडची लस तयार झाल्याची आनंददायी बातमी घेऊनच. अनेक राष्ट्रांनी संशोधित वेगवेगळ्या लसी उपलब्ध झाल्या. पण प्रचंड मोठ्या प्रमाणावर त्याचे उत्पादन करण्याचा विक्रम आपल्या भारत देशाने केला. स्वत:च्या नागरिकांना ही सुविधा देताना अत्यंत मागासलेल्या देशांचा विचार करून त्यांना व शेजारी राष्ट्रांनाही तातडीने भारताने लसीचा पुरवठा सुरू केला.

आपल्या देशाची लोकसंख्या बघता शंभर टक्के लसीकरणाला बराच वेळ लागणार. म्हणूनच आपल्याकडे लसीकरण तीन टप्प्यात केले जाणार आहे. आता प्रथम वैद्यकीय सेवेशी संबंधित डॉक्टर्स, नर्सेस व इतर सर्व रुग्णालय कर्मचारी. त्यानंतर फ्रंट लाईफ वर्कर्स म्हणजेच आपल्याला सर्व प्रकारच्या सोयीसुविधा पुरवणारे लोक. नंतर वृद्ध, आजारी माणसे व नंतर इतर सर्व जनता. लसीकरणास सुरवात होताच नेहमीप्रमाणेच उलटसुलट चर्चांना उधाण आले. त्यातच व्हॉट्सऍप युनिव्हर्सिटीने भर घातली प्रत्येक गोष्टीचे राजकारण करणारी आपली नेतेमंडळी याही विरोधात दंड थोपटून उभी राहिली. त्यांनी सामान्य माणसाच्या मेंदूत खळबळ माजवण्याचे काम उत्तम केले. त्यामुळेच विलेपार्ल्यातील नामवंत व विश्वासू डॉक्टर्स आणि महानगरपालिकेच्या के वार्डच्या मेडिकल ऑफिसर यांच्याशी आम्ही संवाद साधला. त्यातून आलेली माहिती व त्यांचे विचार आपल्या संभ्रम दूर करण्यास मदत करतील.

डॉ.सुहास पिंगळे --- माझ्या मते सर्वांनी वॅक्सीन घेतलेच पाहिजे. यात हानीकारक काहीच नाही. सर्वसामान्य माणसाच्या मनातील काही शंका व त्याचे निराकरण खाली देत आहे.



**१) ज्यांना कोविड होऊन गेला आहे त्यांच्याकडे आता अँटीबॉडीज आहेत. मग लसीकरणाची गरज काय?**

त्यांच्या अँटीबॉडीज फक्त तीन ते चार महिने असतात. त्यानंतर त्यांनाही पुन्हा संसर्ग होऊ शकतो. त्यामुळे लसीकरण गरजेचं.

**२) ह्या लसींचा पुरेसा अभ्यास झालेला नाही. त्यामुळे ती सुरक्षित आहे का?**

मुळात कोणत्याही इतर रोगांवरील लसींचा गेले कित्येक वर्ष अभ्यास व उपयोग होत आहे. पण हा आजारच मुळात एका वर्षापूर्वी आलेला आहे. जरी घाईघाईने या लसी निर्माण केल्या गेल्या असल्या तरी त्यांना सावधानतेच्या सर्व निकषांवर पारखूनच वापरात आणले आहे. फक्त यांच्यामुळे किती काळ संरक्षण मिळेल हेच कळायचे बाकी आहे. मात्र ते वापरातूनच कळणार.

**३) या लसीचे रिॲक्शन  येते म्हणजेच त्याला साईड इफेक्ट असणार. अजून एक तर्क.**

मित्रहो, प्रत्येक लसीची थोड्याफार फरकाने रिॲक्शन येतेच. जसं पोलिओ ट्रिपल नंतर थोडा ताप येतो, इंजेक्शनच्या जागी दुखतं, थोडा ताप येणे, चक्कर आल्यासारखं वाटतं, अशा अत्यंत संयमी रिॲक्शन काही जणांना येतात.  त्याचा बाऊ करण्यासारखे काही नाही.






**४) बारा वर्षाखालील मुले व गरोदर स्त्रिया यांना लसीकरण करू नका सांगतात म्हणजे त्यात काहीतरी वाईट असणारच हा अजून एक संभ्रम.**

खरं सांगता बारा वर्षांखालील मुले व गरोदर स्त्रिया यांच्या शरीरात सतत हार्मोन्समध्ये बदल होत असतात. अशा वेळी त्यांच्यावर लसीचा काय परिणाम होईल याचे संशोधन चालू अवस्थेत आहे. म्हणून त्यांना लसीकरणापासून लांब ठेवले जात आहे. तसेच बारा वर्षांखालील मुलांत फारसा आजाराचा प्रादुर्भाव नाही व गरोदर स्त्रियांना बाळंतपणानंतर लसीकरण करता येणारच आहे.

तेव्हा विश्वासाने लसीकरणासाठी नाव नोंदवा. स्वत:ला व पर्यायाने समाजाला सुरक्षित करा. लसीकरणानंतरही मास्क वापरणे, हात धुणे आदी संरक्षक नियम पाळायचेच आहेत. कारण तुम्ही सुरक्षित झालात तरी तुम्ही इतरांना आजार पोहोचवू शकता. त्यामुळे स्वत: सुरक्षा कवच धारण करा व इतरांच्याही सुरक्षित जगण्यास प्राधान्य द्या.

के वार्ड मेडिकल ऑफिसर डॉ. उर्मिला पाटील ----. महानगरपालिकेने आपल्या सर्वांच्या आरोग्य सुरक्षेसाठी लसीकरणास सुरुवात केली आहे. के ईस्ट वॉर्ड मध्ये या साथीच्या काळात दिवसाला दोनशे-अडीचशे रुग्ण मिळत होते. त्याची आज



सरासरी वीस वर आली आहे. साडेनऊ लाख लोकसंख्या असलेल्या आपल्या वॉर्डात आज ॲक्टिव्ह केसेस दोनशे-अडीचशे वर आल्या आहेत. हे पहिलेच प्रौढ लसीकरण असल्याने संभ्रम खूप आहेत.

सहसा आपण लहान मुलांचे लसीकरण करतो. त्यांना थोडे ओकारी येणे, जुलाब होणे, ताप येणे एखादा दिवस होते. पण त्याबद्दल आपल्याला संभ्रम नसतो. एखाद्या दिवसाचा त्रास सहन करुन आयुष्यभराची कवचकुंडले मिळवणे फायद्याचे असते. इथेही तसेच आहे. मात्र मोठ्या माणसांसाठी आहे.

महानगरपालिकेने ९० केंद्रे लसीकरणासाठी उघडली आहेत. आपले नाव साइटवर टाकून नावाचे रजिस्ट्रेशन करायचे. ज्या दिवशी आपला नंबर येईल त्याची माहिती आपणास कळवली जाते. त्या दिवशी आधार कार्ड, अथवा पॅन कार्ड (ओळखपत्र) घेऊन केंद्रावर जायचे व लसीकरण करून घ्यायचे आहे. पहिल्या टप्प्यात याच पद्धतीने लसीकरण चालू आहे. सुरुवातीला साईटने त्रास दिला मात्र आता सर्व सुरळीत झाले आहे. एकदा लस टोचल्यावर चार आठवड्यांनी दुसरा डोस घ्यायचा आहे. त्यानंतर १४ दिवसांनी तुमची प्रतिकारक्षमता तयार होऊ लागते. आज महानगरपालिकेच्या सर्व डॉक्टरांचे लसीकरण पूर्ण झाले आहे व इतर कर्मचारी वर्गाचे चालू आहे. त्यानंतर फ्रंट लाइफ वर्करचे लसीकरण होईल. याप्रमाणे साधारण तीन महिन्यानंतर सामान्य जनतेच्या लसीकरणाला सुरुवात होईल. आपल्या वॉर्डातील डॉक्टर व नेते डॉ. दीपक सावंत यांच्या लसीकरणाने सुरुवात केली आहे. कुपर हॉस्पिटल, सेव्हन हिल्स हॉस्पिटल व बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स येथील केंद्रे आपल्याला नजीकची आहेत.



डॉ. शेखर आंबर्डेकर (कार्डिओलॉजिस्ट) ---- मी व माझ्या सारख्या अनेक डॉक्टर्सनी स्वत: लस टोचून घेतली आहे. मला वाटतं औषधांची खात्री असल्याशिवाय कोणी डॉक्टर स्वत:ला लस टोचून घेणार नाही. त्यामुळे सर्वांनी अत्यंत विश्वासाने लसीकरण करून घ्यावे. मी २० तारखेला लस टोचून घेतली व २१ तारखेला मॉर्निंग वॉक करून दिवसाचे पूर्ण वेळापत्रक पार पाडले. आमच्या हॉस्पिटल मधूनच माझे नाव नोंदवले गेले. माझा नंबर आल्यावर मी लसीकरण करून घेतले. लहान मुलांच्यात मुळातच हा आजार अगदी किरकोळ प्रमाणात आढळला व तीव्रही झाला नाही. त्याला कारण कदाचित त्यांचे चालू असलेले इतर लसीकरण व त्यातील औषधे असू शकतात. त्यावर संशोधन चालू आहे. कोणत्याही नवीन औषधाचा वापर गरोदर स्त्रियांमध्ये केला जात नाही. त्यामुळेच केवळ त्यांना लसीकरणापासून बाहेर ठेवले आहे. यातून आपल्याला किती काळ संरक्षण मिळेल हे ७० % लोकांचे लसीकरण झाल्यावरच कळेल. भारतात लसीकरण झालेले सर्वात जास्त लोक आहेत. फक्त आपल्या लोकसंख्येच्या टक्केवारीत ते कमी भासत आहेत. पण पुढच्या सहा-सात महिन्यात यात लक्षणीय फरक दिसेल. आज अनेक जण कोवॅक्सीन या लसीवर संशय व्यक्त करीत आहेत. मात्र ते सर्वात चांगले औषध असेल असा डॉक्टरांचा अंदाज आहे. काही ठिकाणी ते मुद्दाम मागून घेतले जात आहे. तरी अफवांना बळी पडून आपले संरक्षक - कवच नाकारू नका. लसीकरण करून घ्या असाच डॉक्टरांचा सल्ला राहील.

संगीता बेहेरे
९८६७७५८३१०




# पार्ल्यातील गुड मॉर्निंग मुंबई !! चा आवाज RJ ग्रीष्मा बेहेरे



गुड मॉर्निंग मुंबई !!! हे ऐकलं कि आठवते ती 'लगे रहो मुन्नाभाई' मधली विद्या बालन आणि तिचा तो रिफ्रेशिंग आवाज. असाच एक आपल्या पार्ल्यातील आवाज जो आकाशवाणीच्या १००.१ अंश Mghz FM Gold वाहिनीवरचा एक प्रसिद्ध आवाज आहे. तो म्हणजे RJ ग्रीष्मा बेहेरेचा. काही आवाज असे असतात कि ज्यामुळे आपला मरगळलेला मूड एकदम छान होऊन जातो आणि आपण पुन्हा एकदा रोजच्या जगण्यातील आव्हानांचा सामना करायला सज्ज होतो. ग्रीष्मा फक्त RJ च नाही तर एक उत्तम लेखिका, अभिनेत्री, कथ्थक नृत्यांगना आणि व्हॉइस ओव्हर आर्टिस्ट सुद्धा आहे.

ग्रीष्मा मूळची कुर्ल्याची. दादरची 'किंग जॉर्ज' तिची शाळा, पण शाळेपासूनच, अभ्यासापेक्षा तिचा कल अभ्यासेतर गोष्टी जशा कि वक्तृत्व स्पर्धा, नृत्य स्पर्धा, बाल नाटकं ह्यातच होता. आधी सौमय्या कॉलेज मधून ज्युनिअर कॉलेज आणि मग बी. एम. एम. (पत्रकारितेमध्ये) तिने रुईया कॉलेजमधून पूर्ण केलं. कॉलेज संपता संपता तिने लोकसत्ता वृत्तपत्रात प्रशिक्षणार्थी म्हणून काम सुरु केलं आणि अंजुमन इस्लाम कॉलेजच्या, हॉटेल मॅनेजमेंटच्या विद्यार्थ्यांच्या उन्हाळी सुट्टीतील उद्योगावर लेख करता करता तिचा स्वत:चा कॉलम लवकरच लोकसत्तेच्या 'विवा' ह्या पुरवणीत सुरु झाला आणि इंग्रजी माध्यमातून शालेय शिक्षण घेतलेली ग्रीष्मा चक्क अस्खलित मराठीत लिहू लागली. आज मागे वळून पाहताना ह्या सगळ्याचं तिला खूप अप्रूप वाटतं. लोकसत्तेच्या त्या पुरवणीत ती 'सेनोरिटा' ह्या नावाने लिहू लागली. अर्थात त्या लेखाखाली तिचं नाव असायचं आणि कितीवेळा असंही व्हायचं कि ट्रेनमध्ये तिच्या बाजूला बसलेल्या मुली तिच्याच लेखाबद्दल बोलत असायच्या. हा कॉलम तिने जवळ जवळ सहा महिने लिहिला ज्यात तिने जगभरच्या वेगवेगळ्या लग्नपद्धतींचा आढावा घेतला होता. तिचा एक मकर संक्रांतीवरचा लेख अमेरिकेतील रेडिओ चॅनेलवर वाचला गेला होता. आधी लोकसत्ता आणि मग लोकप्रभा मध्ये तिचे लेख नियमित प्रसिद्ध होत होते आणि त्याचवेळी आकाशवाणीवर तिला बॅंक ऑफिसचे काम सांगून आले आणि तिच्या एका नव्या प्रवासाला सुरुवात झाली. मधल्या काळात ती लग्न होऊन पार्ल्यात स्थायी झाली. आकाशवाणीवर बॅंक ऑफिसचे काम करता करता तिने RJ च्या पोस्टची जाहिरात बघितली आणि अर्ज केला. ह्यात तिला मदत झाली ती व्हॉइस गुरु दीपक वेलणकर सर ह्यांच्या केलेल्या व्हॉइस कल्चर क्लासची. आणि तेव्हापासून सुरु झाला रेडिओवरचा तिचा प्रवास. कधी नाटकांवर चर्चा, कधी चित्रपटांवर, कधी तरुणाईशी गप्पा, कधी प्रदीप वेलणकर ह्यांच्या सारख्या प्रसिद्ध अभिनेत्याची मुलाखत तर कधी NSE च्या अर्थतज्ञ चंद्रशेखर ठाकुरांची मुलाखत. असा तिचा प्रवास सुरु आहे. ह्याच बरोबर पार्ल्यातल्या सांस्कृतिक वर्तुळात तिचं काम चालू असतं. लोकमान्य सेवा संघाच्या गणेशोत्सवाच्या निमित्ताने होणाऱ्या नाटकात ती दोन-तीन वर्ष काम करत होती. तिने तिच्या रुईया कॉलेजच्या दिवसात, नाटकाच्या ग्रुपबरोबर 'ग म भ न' ह्या नाटकाचे ५०च्या वर व्यावसायिक प्रयोग केले होते. तिला अभिनयात मदत होते ती तिच्या कथ्थक नृत्याच्या प्रशिक्षणाची. पण कथ्थकचे प्रशिक्षण पूर्ण न करू शकल्याची खंत आजही तिला आहे पण भविष्यात तेही नक्की करीन हि जिद्द ती बाळगून आहे. त्याचबरोबर ती वेगवेगळ्या संस्था, शाळा-महाविद्यालये इथे आवाजाची कार्यशाळा सुद्धा घेते. आवर्जून सांगण्यासारखी गोष्ट म्हणजे माधुरी दीक्षितच्या एकमेव मराठी चित्रपटात, 'बकेट लिस्ट' मध्ये ग्रीष्माने एक छोटीशी भूमिका केलेली आहे.

आपण सगळ्यांनी झी मराठी वरचा 'आम्ही सारे खवय्ये' हा कार्यक्रम बघितला असेल, त्यात जो आवाज आपण ऐकतो 'साहित्य... कृती' इत्यादी तो काही काळ ग्रीष्माचा होता. सध्या ती दूरदर्शनवर अनेक कार्यक्रमात व्हॉईस ओव्हर आर्टिस्ट म्हणून काम करते त्यातील अगदी आत्ताचा म्हणजे 'नेव्ही डे डॉक्युमेंट्री' चा कार्यक्रम. तसेच सध्या ती इ-स्कुल ह्या प्रोजेक्टला आपला आवाज देत आहे. वाचकांसाठी तिच्या कामाच्या काही लिंक्स मी इथे देत आहे.

नेव्ही डे डॉक्युमेंट्री

https://youtu.be/x7564gHUnqg

इ-स्कुल

https://devpos.prathamopenschool.org/CourseContent/Video/Food_Preservation_MR_202009211053180062.mp4

तर अशी ही ग्रीष्मा, रिं, व्हॉइस ओव्हर आर्टिस्ट, कथ्थक नृत्यांगना, लेखिका आणि अभिनेत्री सुद्धा. गेले वर्षभर लॉकडाऊनमुळे, प्रवासाच्या साधनांअभावी ती रेडिओवर कार्यरत नाही पण लवकरच तिचा आवाज आपल्याला ऐकायला मिळेल ह्याची खात्री आहे. आता पुढच्यावेळी जेव्हा मुन्नाभाई बघाल आणि 'गुड मोर्निंग मुंबई'!! ऐकाल तेव्हा तुम्हाला आपल्या पार्ल्यातील ग्रीष्माची आठवण आल्याशिवाय राहणार नाही.

**डॉ. अमेय तानवडे**
**मोबाईल नंबर- ९८२०४३२७२०**
**ameya.tanawade@gmail.com**

८ महिन्यांच्या लॉकडाऊन नंतर संकल्प टूर्स च्या कस्टमाईज्ड/ ग्रुप टूर्स देतील हवा तो चेंज... रिफ्रेशमेंट !!
कस्टमाइज्ड पॅकेजेस
हनिमून पॅकेजेस
महाबळेश्वर / गोवा
डेली पॅकेजेस
२ रात्री/ ३ रात्री
सर्वसमाविष्ट ग्रुप टूर्स
१ रात्री हॉटेल / ए.सी. बस / सर्व भोजन समाविष्ट
हुरडा पार्टी – आरोह सृष्टी फार्म – रांजणगाव १३ फेब्रु, १३ मार्च
पोपटी पार्टी – नागाव बीच, अलिबाग २७ फेब्रुवारी १९ मार्च
नाशिक बोट क्लब (सुला वाईन सह) २० फेब्रुवारी ६ मार्च
२ रात्री हॉटेल / ए.सी. बस / सर्व भोजन समाविष्ट
अष्टविनायक – दर शुक्रवारी सकाळी
औरंगाबाद – अजंठा, एलोरा १८ फेब्रुवारी २६ मार्च
महाबळेश्वर – स्ट्रॉबेरी फेस्टिवल ११, २६ फेब्रुवारी १९ मार्च
ताडोबा टायगर सफारी १७ फेब्रुवारी, १७ मार्च (नागपूर ते नागपूर)
दापोली- आंजर्ले - दाभोळ - गुहागर- वेळणेश्वर- हेदवी १२ फेब्रु, १९ मार्च
दत्तधाम – दर गुरुवारी रात्री
३ रात्री हॉटेल / ए.सी. बस / सर्व भोजन समाविष्ट
कोंकण दर्शन- तारकर्ली - मालवण, गणपतीपुळे १७ फेब्रु, २५ मार्च
शेगांव-कोल्हापूर-माहूरगड-आंबेजोगाई १७ फेब्रु, २५ मार्च
SHOP NO. 6,EASTERN COURT, PARLESHWAR RD., NEAR ARYA BHAVAN RESTAURANT, VILEPARLE EAST
SANKALP TOURS & TRAVELS An Unique Experience
Sunil Tarkar 7738121381 • Office 26118901, 8433662699
Email : sankalptours1212@gmail.com • Web : www.sankalptoursandtravels.com
सहलींचे REVIEWS / VIDEO CLIPS वर जरूर पहा

# गो फ्लेमिंगो

फेब्रुवारी महिन्यातील रम्य सकाळ. समोर खाडीचे आत घुसलेले पाणी. पलीकडे गर्द झाडी असलेली छोटेखानी टेकडी. पाठीमागे क्षितिजावर नुकत्याच उगवलेल्या सूर्याचा नारिंगी-लाल गोळा आणि बोचरी नसली तरी अंगावर शहारे आणणारी थंडी. गुलाबी थंडीबरोबरच जलाशयात मुक्तपणे उधळलेला गुलाबी रंग. हे सर्व जर तुमच्या डोळ्यांना सुखावेल असे वाटत असेल तर तुम्ही नवी मुंबईची फेरी कराच!

दहा-पंधरा दिवसांपूर्वी आम्ही काही मित्र पुण्यावरून



परतत होतो. आम्हा सर्वांना निसर्गाची खूप आवड असल्याने गप्पा रंगल्या असून देखील सगळे बाहेर नजर ठेऊन होते. पाम बीच रस्त्याला लागून असलेल्या खाजण जमीनलवरील झुडुपात अनेकदा पक्षी-प्राणी दिसतात. गाडी दिल्ली पब्लिक स्कूलजवळ आली आणि अचानक आकाशातून रोहित पक्ष्यांचा एक थवा उथळ पाण्यात उतरताना दिसला. आणि इथे आम्हा सर्वांच्या चेहऱ्यावरील उत्साह वाढला. सर्व्हिस रोडवर गाडी उभी करून अनेक लोक खाली उतरून पाण्याजवळ गेले होते. आम्हीही त्यात सामील झालो.

समोरचं दृष्य पाहिल्यावर आनंदाने रोमांच उभे



राहिले. पाण्याच्या रेषेपासून केवळ १५-२० फुटांवर सी गल्सचा थवा मजेत तरंगत होता. काही घिरट्या घालत होते. काही सूर मारून मासे पकडण्याचा उद्योग करत होते आणि पलीकडे पाण्याचा पृष्ठभाग संपूर्ण झाकला जाईल इतक्या संख्येने फ्लेमिंगो होते. ही पक्षिसंख्या जणू काही कमी आहे म्हणून कि काय देव जाणे, नवीन थवे येत होते आणि दोनचार घिरट्या मारून उतरत होते. कसं कोण जाणे पण एक थवा उतरून स्थिरावल्यानंतर दुसरा ठिपका दिसू लगे. मिनिटभरात हा ठिपका मोठा होत थवा आणि त्यातील पक्षी दिसू लागत. फुलांची माळ कोणीतरी भिरकावून टाकल्याने त्यातील फुले फेकली जावीत तसे पक्षी आपापली जागा शोधत खाली उतरत. इकडे भरतीच्या लाटा येत होत्या आणि तिकडे फ्लेमिंगोच्या. कमीत कमी पंचवीस ते तीस आवर्तने आम्ही बघितली. साधारण ८-१० हजार फ्लॅमिंगोचा समुदाय जमला होता. नीट पाहिलं तर त्यातील पिल्ले किंवा पूर्ण वाढ न झालेले पक्षी काठाकडे सरकले होते आणि पूर्ण वाढ झालेले थोडे आत म्हणजे खोल पाण्यात होते. वयात येण्यापूर्वी फ्लॅमिंगोंची पिसे मळकट चॉकलेटी रंगाची असतात. वयात आल्यावर चोच, डोळे लाल आणि पाठीवरील पिसे गुलाबी रंगाची दिसायला लागतात. विणीच्या हंगामात मादीला आकर्षित करण्यासाठी निसर्गाने केलेली एक किमया.

बारकाईने पहिले तर त्यांच्या हालचाली ऑलिम्पिक मधील सिंक्रोनाईज्ड स्वीमर्सला लाजवणाऱ्या. काही फ्लेमिंगो एका पाठोपाठ सरळ रेषेत चालत असतात. तर काही पाण्यात मान खुपसून शेवाळ, बेडूक, छोटे मासे आदी गट्ट करत एका मागोमाग



एक चालत असतात. काही आकाशाकडे मान उंचावून बघत असतात तर काही एकमेकांच्या भोवती मानेचा विळखा घालत असतात.

विषम हवामान असलेल्या इराण, पाकिस्तान, इस्रायल, अफगाणिस्तान या देशात थंडी पडू लागली की हजारो फ्लेमिंगो पक्षी स्थलांतर करून भारतातील अनेक ठिकाणी वास्तव्याला येतात. भारतातील राजस्थान, कच्छचे रण येथूनही पक्षी स्थलांतर करतात. हे स्थलांतरित पक्षी मग वसई, ठाणे, नवी मुंबई तसेच कोकण किनाऱ्यावरील काही



जागी ऑक्टोबर ते मार्च या काळात आपले वास्तव्य करून राहतात. निसर्गाची ही एक आगळीच लीला आहे. या मागे थंडीपासून बचाव हे एकमेव कारण नाही. वंशवृद्धी आणि सक्षम पिलांची निपज हा हेतू पण निसर्गाने साध्य केला आहे. नुकत्याच संपलेल्या पावसामुळे बेडूक, खेकडे, छोटे मासे, कोळंबी, झिंगे तसेच शेवाळ यांच्या मुबलकतेने नवजात पिल्लांना सकस खाणे उपलब्ध होते. झपाट्याने वाढ झालेली पिल्ले मग आईबापांच्या बरोबर स्वगृही उडून जायला सक्षम होतात. एप्रिलनंतर मग गटागटाने मातृभूमीकडे प्रस्थान सुरु होते.

कोव्हीड-१९ च्या लॉकडाऊनमुळे दृष्टीस न पडणारी माणसे, कमीतकमी पातळीवर आलेलं पाणी, हवा आणि ध्वनी प्रदूषण याचा फार मोठा फायदा निसर्गाचा समतोल सांभाळायला झाला आहे. फ्लॅमिंगोच्या (मराठीमध्ये रोहित पक्षी) संख्येत यावर्षी लक्षणीय वाढ झालेली दिसत आहे. सध्या नवी मुंबई, ठाणे, वाशी तसेच वसईच्या किनाऱ्यावर हजारोंच्या संख्येने फ्लेमिंगो अवतरले आहेत. पक्षीप्रेमींना ही सुवर्णसंधी असली तरी जाणकार माणसाबरोबर आणि भरतीची वेळ सांभाळून जाणे



फायदेशीर ठरेल.

कितीतरी वेळ मंत्रमुग्ध होऊन आम्ही रंगांची आणि निसर्गाची उधळण बघत होतो. प्रसिद्ध कवी फॉस्टर हे घनदाट जंगलात गेलेला रस्ता असाच बघत असताना त्यांच्या घोड्याने हिसका दिला आणि ते भानावर आले. कोणीतरी मित्राने अशीच आठवण करून दिली. उद्या सोमवार होता. सगळ्यांना कामावर रुजू व्हायचं होत. अनेक कामे वाट बघत होती. आम्ही एक सुखदायी आठवण मनाच्या कोपऱ्यात बंदिस्त करून मोठ्या कष्टाने पावले गाडीकडे ओढत नेली.

**संजय देवस्थळी**
९८३३८६६४६२

# घरातील समृद्ध अडगळ



मागच्या महिन्यात आपण घरातील ऍप्लिकेशन्स कमी करून म्हणजेच घरात साठवून ठेवलेली अनेक अवजारे ज्यासाठी वापरतात त्याची सेवा वापरली तर घरातच अजून जागा कशी तयार होते हे बघितले. काही गोष्टी आपण फारशा भावनिक गुंतवणूक नसल्याने कमी करू शकतो पण आपल्या घरातील अनेक ड्रॉवर्स, कपाटे, पोटमाळे हे अशा कित्येक गोष्टींनी भरलेले असतात. त्या टाकून देण्याचा आपण विचारही करू शकत नाही. यात अनेक फोटो अल्बम असतात, अनेक जुन्या भेटी असतात, अनेक शोभेच्या वस्तू असतात ज्या खरंतर आजच्या काळाशी विसंगत असतात पण ज्या व्यक्तीने किंवा आठवणीने त्या घरात आल्या असतात त्या भावनांचा विचार केला तर आपण टाकायचा विचारही करू शकत नाही. उदाहरण सांगायचे तर माझ्या घरी मी कॉलेजमध्ये असताना आमच्या संघानी जिंकलेली एक क्रिकेटची ढाल आहे, बाबांच्या एका सत्कारात मिळालेले काचेच्या पेटीतील चंदेरी जाळीचे जहाज आहे, इतकेच काय मुलांची काही मोजकीच पण लहानपणीची खेळणी आहेत. अर्थात सर्वात जास्त जागा कशाने व्यापली असेल तर फोटो अल्बमने. थोडक्यात सांगायचे तर ही आपले जीवन समृद्ध करणारी अडगळ आहे.

माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात डिजिटल आणि क्लाउड स्टोरेज हे आजचे परवलीचे शब्द आहेत. यात डिजिटल या शब्दाशी आज आपण कॉर्पोरेट क्षेत्रातच नाही तर रोजच्या आयुष्यातही जोडले गेलेलो आहोत. डिजीटल व्यवहारांमुळे किती कागद वाचत असेल याचा विचार केला तर वेगळी हरितक्रांती करायची गरजच भासणार नाही इतकी झाडे वाचत असतील. डिजिटल तंत्रज्ञानाचा मुख्य हेतू म्हणजे कागद बाळगायची अडचण आणि खराब होण्याचा धोका नसणे, जागेची बचत आणि मुख्य म्हणजे जेव्हा हवे तेव्हा हाताशी उपलब्ध असणे. क्लाउड स्टोरेज म्हणजे थोडक्यात सांगायचे तर आपल्या घरातली जागा, साठवण्यासाठी न वापरता दुसरी एक अत्यंत सुरक्षित, कधीही जाता येईल अशी जागा वापरणे.

आपल्या घरातील या समृद्ध अडगळीचे जर आपण वर्गीकरण केले तर आपल्याला या डिजिटल आणि क्लाउड स्टोरेज या दोन्ही तंत्रज्ञानाचा उत्तम वापर करता येईल. आपल्या घरातील सर्व फोटो अल्बमचे डिजिटल रूपांतर केले तर खिशात राहणाऱ्या एका छोट्या पेन ड्राइव्हमध्ये साठवण होऊ शकते. एकेक फोटो अल्बमचे वर्गीकरण करून विशिष्ट पद्धतीने नामांकन करत जर ते साठवले तर कधीही कुठचाही फोटो हवा असेल तर लगेच उपलब्ध होऊ शकतो. आज प्रत्यक्ष फोटो साठवूनही जेव्हा हवा तेव्हा एखादा फोटो आपल्याला सहजासहजी मिळायची शाश्वती नसते. हे डिजिटल माध्यमात साठवलेले फोटो जर पेनड्राइव्ह पेक्षा आपण क्लाउड स्टोरेजवर जे आज गुगल, मायक्रोसॉफ्ट सारख्या अनेक कंपन्या फुकटात देतात (काही विशिष्ट साईझ पर्यंत) साठवले तर ते सुरक्षिततही राहतात आणि जगाच्या कुठच्याही कोपऱ्यातून आपल्याला बघता येतात. फोटोसारखेच आपल्या महत्वाच्या कागदपत्रे, सर्टिफिकेट्स याबाबतही हा न्याय लागू आहे.

प्रश्न उरतो तो म्हणजे ही कागदपत्रे, फोटो जरी डिजिटली साठवले तरी ओरिजिनल आपण काही टाकून देऊ शकत नाही. जसे फोटोंबाबत तसेच बाकीच्या वस्तूंबाबत आहे ज्या डिजिटली साठवता येत नाहीत. इथे आपण क्लाउड स्टोरेजचा डिजिटल हा प्रकार बाजूला ठेवला आणि फक्त 'आपल्या घरी नाही तर दुसऱ्याच्या घरात' हा हेतू लक्षात घेतला तर आपल्याला अशी दुसरी घरे शोधावी लागतील. अर्थात आपली अडगळ ठेवायला कुणी दुसरा आपले घर उपलब्ध करून देणार नाही. इथे उपयुक्त येतील ती आपल्यासारख्या अनेकांनी हौसेने घेतलेली सेकंड होम्स. ज्या गोष्टी टाकवत नाहीत पण रोजच्या काय वर्षानुवर्षे वापरात येत नाहीत त्या आपण खोक्यात ठेऊन अशा दुसऱ्या घरात ठेवल्या तर मूळ घरात प्रचंड जागा उपलब्ध होईल. भावंडांमध्ये किंवा मित्रामित्रांत असे एखादे सेकंड होम नक्कीच निघेल जे हौसेने घेतलेले असते पण विशेष जाणे नसते. सामंजस्याने अशा ठिकाणची एखादी खोली ही समृद्ध अडगळ साठवण्यासाठी नक्कीच वापरता येईल.

भालचंद्र नेमाड्यांनी 'हिंदू - जगण्याची समृद्ध अडगळ' मध्ये दोन शेजारच्या देशातील साम्यस्थळे दाखवत ही अडगळ मांडली. आपण आपली समृद्ध अडगळ अशीच आपले आणि कुठचे तरी क्लाऊडरूपी किंवा दुसऱ्या ठिकाणचे घर वापरत जपली पाहिजे.

**-निमिष वा. पाटगांवकर**
९८७०४६९९९३

# खाऊगल्ली



खाणं-पिणं हा आपल्या सगळ्यांच्याच जिव्हाळ्याचा विषय आहे. विषय जरी जिव्हाळ्याचा असला तरी आपल्या प्रत्येकाच्या आवडीनिवडी वेगवेगळ्या असतात. काहींना शाकाहारच आवडतो तर काही लोकांना मांसाहार जास्त आवडतो. भारताचा विचार करायचा झाला तर आपल्याला भारतीय जेवण उत्तर म्हणजे भारतीय, दक्षिण भारतीय, महाराष्ट्रीयन, गुजराथी, राजस्थानी, पंजाबी या व्यतिरिक्त



चायनीज, इटालियन, काँटिनेंटल हे पदार्थ जास्त आवडतात. पदार्थ जसे वेगवेगळे तसेच ते बनवणारी हॉटेल्स पण वैविध्यपूर्ण. ठराविक पदार्थ हे काही हॉटेल्सची खासियत असतात.

या वेळी आपण ज्या हॉटेलला भेट देणार आहोत ते आहे नेहरु रोडवर असलेलं 'ग्रीन वूड्स'. ग्रीन



वूड्सची खासियत अशी कि या लॉकडाऊनच्या काळात त्यांनी 'टेकअवे कोल्हापुरी थाळी' इंट्रोड्युस केली. ही पूर्ण पोटभरीची थाळी असून 'हीट अँड ईट' अशी कॉन्सेप्ट आहे. घरी फक्त गरम करा आणि खा. आवर्जून ट्राय करायला हवी ती म्हणजे



सोलकढी. पाणी न वापरता फक्त आणि फक्त नारळाचं दूध वापरून केलेली ही सोलकढी फारच चविष्ट लागते. ३२ वर्षांपासून सुरु असलेलं हॉटेल 'ग्रीन वूड्स' मध्ये व्हेज गुप्ता गडवाली, चोप्राठी, चमानी, पनीर राडो अश्या स्पेशल व्हेज डिशेस आहेत तर बंजारा कबाब मसाला, मटण रोगान जोश, घुना जोश, कोल्हापुरी चिकन, गोवन स्टाईल फिश, स्टफ फिश ग्रीन मसाला, किंग प्रॉन्स राडो मसाला अशा काही नॉनव्हेजच्या स्पेशल डिशेस. चायनीज मध्ये व्हेज स्किवर क्रिस्पी पोटॅटो, पॉट राईस, व्हेज फिंगर रॅप नुडल्स, व्हेज कोरियन राईस तर अगदी वेगळी डिश म्हणजे फिश फेनुग्रीक. अजून एक



खासियत म्हणजे व्हेज तांबडा पांढरा रस्सा. दर १५ दिवसांनी कुठली तरी नवीन डिश ते घेऊन येतात. काय मग, कधी भेट देताय हॉटेल 'ग्रीन वूड्सला' ?

फ्लेवर्स ऑफ द वर्ल्ड :-

जगाच्या पाठीवरचा प्रत्येक देश हा भिन्न भिन्न संस्कृतीने नटलेला आहे. एखाद्या देशाची संस्कृती म्हणजे काय, हे शब्दश: सांगणे तसे अवघड आहे. पण ढोबळपणे बघता त्या देशाचा इतिहास, तिथली कला, भाषा, पाकशैली अशा अनेक दृश्य व अदृश्य गोष्टींचे मिश्रण म्हणजे त्या देशाची संस्कृती, असे म्हणता येईल.

प्रत्येक देशाच्या संस्कृतीचा एक भाग म्हणजे तिथली खाद्यसंस्कृती. ही खाद्यसंस्कृतीदेखील त्या देशातील रूढी, परंपरा, लोकांची जीवन शैली, त्या देशाचे भौगोलिक स्थान व हवामान अशा विविध गोष्टींवरून तयार झालेली असते.

प्रत्येक देशात सकाळच्या न्याहारीपासून ते रात्रीच्या जेवणापर्यंत कोणते पदार्थ खायचे ते साधारणपणे ठरलेले असतात. सणासुदीचे पदार्थ वेगळे, तर निरनिराळ्या ऋतूंतील पदार्थ वेगळे. ते कसे करायचे, कसे खायचे, केव्हा खायचे याचेदेखील एक गणित असते. आपण जर वेगवेगळ्या देशांच्या खाद्यसंस्कृतीत डोकावून बघितले तर आपल्याला त्यातील अनेक नवनवीन पैलू व खास गोष्टी समजतील.

युरोप, आफ्रिका व आशिया खंडातील काही देशांत आजही स्वयंपाकासाठी मातीची भांडी वापरली जातात, मात्र प्रत्येक ठिकाणी ती तिथल्या संस्कृतीनुसार व त्यात शिजवल्या जाणाऱ्या पदार्थांनुसार निरनिराळी असतात, असे दिसून येते. जर्मनीमधले रोमन पॉट, फिलिपिन्सचे पलायोक, व्हिएतनामचे खो तर जपानमधले डोनाबे ही त्यापैकी काही. त्यांची नावे वेगळी, त्यांचे आकार वेगळे, त्यात करायचे पदार्थ वेगळे, पण ती वापरण्यामागची शास्त्रीय वा इतर कारणे मात्र जगभरात सगळीकडे एकच आहेत.

सौजन्य - माझी खाद्यभ्रमंती ( मृणाल तुळपुळे )

अशाच जगभरातल्या वेगवेगळ्या खाद्यपदार्थांविषयी आणि त्या निगडित काही गोष्टी, पाककृतींविषयी आपण वाचणार आहोत या सदरात. काय मग खाद्यभ्रमंती करायला तुम्ही तयार आहात ना ?

**- ग्रीष्मा बेहेरे**

९९६९३९२५८८

# वृत्तविशेष

## पुस्तक प्रकाशन

रविवार दि. ७ फेब्रुवारी २०२१ रोजी संध्याकाळी ४ ते ६ या वेळात रमाबाई परांजपे बालमंदिरच्या सभागृहात पुस्तक प्रकाशनाचा एक सुंदर सोहळा संपन्न झाला. विलेपार्ल्याच्या रहिवासी एस. एन. डी. टी. विद्यापीठाच्या निवृत्त प्राध्यापिका डॉ. सुजाता फडके लिखित ' जबाबदार पालकत्व ' हे पुस्तक उन्मेष प्रकाशनातर्फे छापले आहे. पुस्तक प्रकाशन ज्येष्ठ मानसशास्त्रज्ञ श्रीमती प्रतिमा हवालदार यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमात लेखिका डॉ. सुजाता फडके यांनी पुस्तक लिहिण्याचा त्यांचा मूळ हेतू व एकंदर पुस्तकाचा जन्म कसा झाला ते सांगितले. उन्मेष प्रकाशनाच्या मेधा राजहंस यांनी हे पुस्तक का छापावेसे वाटले त्याबद्दल आपले विचार मांडले. श्रीमती हवालदार यांनी या पुस्तकात आलेल्या शिस्तीचे महत्त्व, सुसंवादाचे सामर्थ्य, लैंगिक शिक्षणाचे महत्त्व अशा महत्त्वाच्या मुद्द्यांवर भाष्य केले व पुस्तकात आलेल्या विचारांचे, दिलेली उत्तम उदाहरणे व मांडलेल्या नव्या नव्या कल्पना यांचे खूप कौतुक केले व लेखिकेचे हार्दिक अभिनंदन केले. पा. टी. वी. इं. मि. स्कूलच्या निवृत्त मुख्याध्यापिका शारदा लिमये यांनी लेखिका डॉ. सुजाता फडके यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू उलगडून दाखवले. कार्यक्रमाला बाल-विकास केंद्राच्या अध्यक्षा श्रीमती अंजली गानू, अभिनेत्री व निवृत्त शिक्षिका श्रीमती रजनी वेलणकर, निवृत्त न्यायाधीश ( कुटुंब न्यायालय) श्रीमती बागेश्री पारीख, श्रीमती कुंदाताई चितळे, डॉ. मेधा शेटे असे अनेक मान्यवर उपस्थित होते. कोविड नियमावलीला धरून ५० लोकांनाच कार्यक्रमाचे निमंत्रण दिले होते. आलेल्या सर्व लोकांनी पूर्ण वेळ मुख्यपट्टी लावून ठेवून सहकार्य केले.


**GOLDEN GATE PROGRAMME**
107 B, 1st Floor, Hemu Arcade, Vile Parle (W), Mumbai 400056
www.goldengatetoiit.co.in

**ATTENTION**

STD-X STUCENTS (ICSE, CBSE, IGCSE, SSC) 2 YEAR GROUP TUITION PROGRAMME FOR

**JEE MAIN AND JEE ADVANCED**
Covering
JEE Main, JEE Advanced, BITSAT, MHT CET
Chemistry : Dr. U.R. Kapadi, Ph.D., IIT (Bombay); Prof. Tarun Ahirwar, B.Tech. (IIT ISM Dhanbad)
Physics : Prof. Manoj Karmarkar, M.Tech., IIT (Bombay); Prof. Indraneel Naik, M.Tech. (NIT)
Mathematics : Prof. Vinayak Antarkar, B.Tech., IIT (Bombay)

**JEE MAIN AND MHT CET**
Covering
XI, XII (HSC), MHT CET, JEE MAIN
Chemistry : Dr. U.R. Kapadi, Ph.D., IIT (Bombay); Prof. Pritam Panchal, M.Sc., IIT (Bombay)
Physics : Prof. Devendra Verma, M.Sc. Physics; Prof. Saurabh Phansalkar, M.Sc. Physics
Mathematics : Prof. Vinayak Antarkar, B.Tech., IIT (Bombay); Prof. C.C. Thite, B.Tech., IIT (Delhi)

Seminars / Entrance Tests / Counselling Sessions. CONTACT US : Prashant Sir : 7039679129 / 9004607404


## श्रीनिवास प्रभुदेसाई यांना मानाचा समाजरत्न पुरस्कार




२३ जानेवारी, शिवसेनाप्रमुख आणि जागतिक दर्जाचे व्यंगचित्रकार माननीय बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त दै. शिवनेर तर्फे समाजरत्नसह अनेक पुरस्कार दिले जातात. समाजातील निरनिराळ्या क्षेत्रातील मान्यवरांना त्यांच्या कार्याबद्दल गौरविले जाते.

यंदा, समाजातील विसंगतीवर बोट ठेवून, गेली पन्नास वर्षांहून अधिक वर्षे सातत्याने अनेक दैनिके, साप्ताहिके, मासिके, हिंदी, मराठी, इंग्रजी माध्यमातून व्यंगचित्रे साकारुन समाजाला रोजच्या कटकटी, टेन्शनमधून क्षणभर विरंगुळा देणारे, चेहऱ्यावर हास्यरेषा उमटवून आनंद देणारे, 'आम्ही पार्लेकर' मधून सुद्धा पार्लेकरांना सुपरिचित असलेले व्यंगचित्रकार 'श्रीनिवास प्रभुदेसाई' यांना मानाचा ' समाजरत्न पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले.

दै. शिवनेरचे संपादक नरेंद्र वि. वाबळे हे 'मुंबई मराठी पत्रकार संघ' या संस्थेचे अध्यक्ष आहेत. गेली तीन वर्षे हा उपक्रम चालवून शिवसेनाप्रमुख व व्यंगचित्रकार माननीय बाळासाहेब ठाकरे यांना स्मृतिदिनानिमित्त आदरांजली वाहतात.

# केन्द्रीय अर्थसंकल्प व आपण




अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी देशाचा पहिला डिजिटल अर्थसंकल्प नुकताच मांडला. यांचे ठळक वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी अर्थसंकल्पासोबत २०२१-२२ चा 'आर्थिक पाहणी अहवाल' सादर केला. या अर्थसंकल्पात बऱ्याच तरतुदी आहेत. त्यातल्या विशिष्ठ किंवा ठळक बाबींवर आपण थोडासा आढावा घेऊ.

१) २०२०-२१ च्या तुलनेत २०२१-२२ या वर्षात अर्थसंकल्पाच्या भांडवली खर्चात १ लाख ४२ हजार कोटींची वाढ.

भांडवली खर्चात वाढ म्हणजेच सरकारने आपला व्याप आणि तिजोरीची दालने देशाच्या सर्वांगीण विकासाच्या उद्देशाने खुली केली आहेत. त्यामुळे नव्या लघु उद्द्योजकांना चालना मिळेल आणि बेरोजगारी कमी होण्यास मदत होईल.

२) आरोग्य क्षेत्रासाठी २,२३,८४६ कोटींची तरतूद - - ग्रामीण भागात १७७८८ आरोग्य कल्याण केंद्र तर शहरी भागात ११०२४ आरोग्य केंद्र उभारणार. - कोरोना लसीकरणासाठी ३५ हजार कोटी

भारत हा नुसताच भौगोलिकदृष्ट्या मोठा देश नसून, भारताची लोकसंख्या ही खूप मोठी आहे. लोकसंख्येच्या तुलनेत आरोग्य केंद्र ही खूपच कमी आहेत. ह्या तरतुदीमुळे विशेषत: ग्रामीण भागात चांगली आरोग्य केंद्रे उपलब्ध होतील. ग्रामीण भागात चांगले आणि सर्वात महत्वाचे म्हणजे वेळेवर प्राथमिक उपचार मिळू शकतील. कोरोनाच्या लसीकरणाला वेग मिळावा ह्या दृष्टिने ३५००० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

३) तीन वर्षात देशात सात नवे टेक्सटाईल्स पार्क

भारत हा कापड व्यवसायाचा खूप मोठा उत्पादक आणि निर्यातदार आहे. भारताच्या कापड उत्पादकांना जगात चांगली मागणी आहे. ह्या टेक्सटाईल पार्क मुळे कापड उद्योजकांच्या भरभराटीला मदत होईल. एक खूप मोठा कामगार वर्ग ह्या उद्योगावर निर्भर आहे.

४) रस्ते आणि महामार्ग निर्मितीसाठी १ लाख १८ हजार १०१ कोटी

रस्ते आणि महामार्ग आपल्या विकासाचा कणा आहे. ह्यामुळे छोट्या छोट्या गावांतसुद्धा विविध सोई उपलब्ध करता येतील. शहरांवरचा भार कमी होईल आणि सर्वांगीण समृद्धता वाढेल.

५) रेल्वेच्या विकासासाठी १ लक्ष ७ हजार १०० कोटी- महानगरांमधील परिवहन सेवेसाठी २७ शहरांकरिता १०१६ किमीच्या मेट्रो मार्गांना मंजुरी. शहरात बससेवा सुरु करणार.

आज सामान्य माणसाचे जनजीवन रेल्वे आणि बसवर अवलंबून आहे. ह्या तरतुदीमुळे जीवन आणि प्रवास अधिक सुखकर होईल हे सांगायची गरज नाही.

ह्या व्यतिरिक्त अनेक विविध योजना राबवण्याच्या दृष्टीने वाटचाल चालू झाली आहे.. उदाहरणार्थ..

भारतीय आयुर्विमा महामंडळ अर्थात एलआयसी भांडवली बाजारात सूचिबद्ध करणार.

बीपीएसीएल, एअर इंडियासह सहा सार्वजनिक कंपन्यांमधील हिस्सा विक्री पूर्ण करण्याचे उद्दिष्ट

शेतमालाला दीडपट हमी भावाची घोषणा

ग्रामीण विकासासाठी ४० हजार कोटींची तरतूद

वन नेशन वन कार्ड योजना उर्वरित चार राज्यांत राबवणार.

डिजिटल देवाणघेवाण करणाऱ्या कंपन्यांची लेख परिक्षणाची मर्यादा ५ कोटींवरून १० कोटी केली.

परवडणाऱ्या घरांच्या कर्जावरील व्याज सूट आणखी एक वर्ष मिळणार.

परवडणाऱ्या घरांचे प्रकल्प उभारणाऱ्या विकासकांना कर सवलत

ह्या प्रत्येक गोष्टीवर सविस्तर लिहिता येणे शक्य नाही. पण सर्वसामान्य हा अर्थसंकल्प सर्वांगीण विकास, सुविधा, ग्रामीण भागांचा विकास आणि आरोग्य क्षेत्र ही मुख्य उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवून करण्यात आला आहे असे मला वाटते. पुढचे १२ ते २४ महिने भारताकरता आर्थिक, सामाजिक आणि औद्योगिक विकासाचे ठरतील अशी अपेक्षा आहे.

**सुचिता आंबर्डेकर** - संस्थापक - टेकवेल्थ

९८२००५६९४३

# देशोदेशी

ह्या पूर्वीच्या लेखात मी म्हटलं होतं की केवळ १५० वर्षांच्या छोट्या कालखंडात इंका साम्राज्यात झालेली भव्य बांधकामं पाहून थक्क व्हायला होतं. त्यामुळेच की काय असाही एक मतप्रवाह आहे की कदाचित इंका साम्राज्याने आधीच कोणीतरी बांधलेल्या इमारतींवर आपला साज चढवून आपला हक्क शाबीत केला असेल. कित्येक ठिकाणी उरलेल्या अवशेषांमध्ये अगदी पूर्णपणे वेगवेगळ्या बांधकाम तंत्राचा वापर एकावर एक चढवलेल्या थरांमध्ये दिसून येतो. उदाहरणार्थ राकी (राक्ची) येथील विराकोचा ह्या इंकांच्या प्रमुख दैवताच्या भव्य देवळाच्या अवशेषांचा हा फोटो पहा. सर्वात खालचा थर अतिशय कौशल्याने कापून एकमेकात गुंतवलेल्या प्रचंड शिळांचा आहे. त्यावरचा थर मातीच्या, उन्हात वाळवलेल्या विटांचा आहे. तर राकी मधील घरांचा खालचा थर अनगड दगड ओल्या चुनखडीत बसवून केलेला दिसतो. अर्थात ही बांधकामं कोणी उभारली ह्या वादावादीपेक्षा त्यांची भव्यता आणि त्यांच्या बद्दलच्या (दंत)कथा मला तरी जास्त भावतात. उदाहरणार्थ – राकीचं देऊळ ही इंका काळात बांधलेली सर्वात भव्य इमारत होती. ९२ मीटर लांब, २५ मीटर रुंद आणि २५ मीटर उंच अशा ह्या देवळावर ५० मीटर रुंद कौलारू छप्पर होतं. वेना कापाक इंकाने हे सोळाव्या शतकाच्या सुरुवातीला बांधलं असावं. परंतु ह्याच ठिकाणी त्याहूनही प्राचीन पूजास्थान अस्तित्वात असावं. येथील स्थानिक लोकांच्या मते देवाधिदेव विराकोचा स्वत: राकी मध्ये आला होता. टिटिकाका सरोवरातील सूर्यबेटावर बसून विराकोचाने सर्व विश्वाची निर्मिती केली आणि त्यानंतर ज्ञान आणि संस्कृति सर्व मानवांना देण्यासाठी तो उत्तरेच्या दिशेने निघाला. ह्या प्रवासात तो जेंव्हा राकीला पोचला तेंव्हा स्थानिक लोकांनी त्याला न ओळखता त्याच्यावर हल्ला केला. म्हणून रागाने त्याने त्या सर्व परिसरावर अग्नीचा पाऊस पाडला (राकी किम्साचाता ह्या सुप्त ज्वालामुखीच्या छायेतच वसल्यामुळे कदाचित ह्या अग्निवर्षावाच्या कथेचं मूळ एखाद्या ज्वालामुखी उद्रेकाच्या सत्यघटनेतही असेल). तेंव्हा राकीच्या गावकऱ्यांना त्याची ओळख पटली आणि त्यांनी विराकोचाचं मूळ देऊळ ज्या जागी तो पहिल्याने अवतरला तिथे बांधलं!

कसा होता हा विराकोचा दिसायला?



कोरलेल्या विराकोचाच्या भव्य प्रतिमेचा हा फोटो पहा. ह्यात आश्चर्याची गोष्ट अशी आहे की ह्या प्रतिमेतील चेहेऱ्याची ठेवण (धारदार नाक, दाढी ई.) इंका राज्यकर्ते किंवा त्यांच्या प्रजेतील केचुआ, आयामारा जमातीचे लोकं ह्यांच्यापेक्षा वेगळीच आहे! ह्यामुळेच कदाचित असंही म्हटलं जातं की मुठभर स्पॅनिश लोकांनी एवढ्या मोठ्या साम्राज्याचा इतक्या सहजतेने पाडाव केला कारण त्यांच्या चेहेरेपट्टीतील (गौरवर्ण, सोनेरी केस, दाढी, सरळ नाक ई.) आणि विराकोचाच्या प्रतिमेतील









साम्यामुळे सुरुवातीच्या काळात त्यांच्यावर अनाठायी विश्वास ठेऊन इंका राज्यकर्त्यांनी त्यांना आपल्या राज्यशकटाच्या अंतर्वर्तुळात प्रवेश करू दिला. असो. फुंकर मारावी इतक्या सहजपणे इंका साम्राज्य उधळलं गेलं हे मात्र खरं.

ओलान्तेताम्बो ह्या महत्वाच्या लष्करी ठाण्याचा पाठराखा असलेल्या पिंकुयुना शिखरावर कोरलेल्या विराकोचाच्या भव्य प्रतिमेचा...

ओलान्तेताम्बोचा हा दुर्गम किल्ला (पहा तिसरा फोटो) स्पॅनिश सैन्याशी मानको इंका युपान्कीने दिलेल्या शेवटच्या लढ्याचा साक्षीदार होता.

इंकांची सर्वात प्रसिद्ध नगरी माचू पिच्चू पर्यंत मात्र स्पॅनिश सैन्य कधीच पोचलं नाही. जवळ जवळ ३०० वर्ष पेरू देशावर राज्य करूनही त्यांना माचू पिच्चूचा सुगावा कसा लागला नाही ही आश्चर्याचीच बाब आहे. त्याचप्रमाणे इतक्या दुर्गम जागी भरभक्कम तटबंदीमध्ये सुरक्षित, अनुल्लंघनीय हजारो फूट उंच कड्यांनी घेरलेल्या आणि अन्न-पाण्याबाबतीत स्वयंपूर्ण नगरीचा त्याग करून इंका गुपचूप परागंदा का झाले हे ही एक न उलगडणारं कोडंच आहे. जवळ जवळ ४०० वर्ष अज्ञात राहिलेली ही भव्य नगरी हिराम बिन्घम ह्या अमेरिकन इतिहासकाराला १९११ साली सापडली. माचू पिच्चूचं सर्वात विहंगम दृश्य पाहण्यासाठी मात्र रेल्वे आणि बस प्रवास करून न जाता, अँडीज पर्वताच्या उत्तुंग शिखरांच्या छायेतून जाणाऱ्या जुन्या इंका महामार्गावरून ६-७ तास चालत माचू पिच्चूच्या सूर्य दरवाज्यात जावं लागतं. येथून दिसणारं उरुबाम्बा नदीचं खोरं, त्याच्या मध्यभागी वाना पिच्चूचा अभेद्य सुळका आणि त्या सुळक्याच्या कुशीत वसलेलं माचू पिच्चू – हे दृश्य केवळ अवर्णनीय आहे. हा शेवटचा फोटो म्हणजे त्याची एक छोटीशी झलक फक्त.

ह्या पुढच्या लेखात मात्र पेरू आणि दक्षिण अमेरिका सोडून आपण एका संपूर्णपणे वेगळ्या संस्कृती बद्दल बोलू.

**सतीश जोशी**

९८२०२२८२७९

# दैनंदिन जीवनात आधुनिक विज्ञान-तंत्रज्ञान

## कृत्रिम मांसाहार ?



मांसाहार चांगला की वाईट ह्याबद्दल कितीही मतभिन्नता असली, तरी जगात जवळ-जवळ नव्वद टक्के लोक मांसाहारी आहेत, ह्यात शंका नाही. किंबहुना, मांसाहाराचा संबंध रक्तदाब, हृदयविकार आणि कर्करोग अशा जीवघेण्या रोगांची वाढ होण्यासाठी आहे, असं सर्वमान्य असलं तरी, मांसाहार करणाऱ्यांचं प्रमाण दिवसागणिक वाढतच आहे. आपलया शरीराची प्रथिनांची आणि काही जीवनसत्त्वांची गरज भागवण्यासाठी मांसजन्य पदार्थांची जरूरी आहेच. अर्थात, 'व्हेगन आहार' घेणाऱ्यांचा एक नवा गट तयार होतो आहेच. व्हेगन म्हणजे, मांस, मासे. हे लोक प्राणिजन्य कोणताही पदार्थ खात नाहीत. उदा. दूध, दही, अंडी वगैरेही, त्यांच्या दृष्टीने प्राणिजन्य, म्हणजे मांसाहारी, अर्थात त्याज्य आहे आणि तरीही अमेरिकेसारख्या देशात मांस-मासे यांचा माणसी वापर वर्षाला शंभर किलो एवढा होतोय! भारतासारख्या देशातही माणसी वर्षाला दोन किलो पर्यंत वापर आहेच. तेव्हा चीन, अर्जेन्टिना, कॅनडाची गोष्ट सोडूनच द्या! जगभरातून वर्षाला जवळजवळ चारहजार कोटी किलो इतकं अफाट मांस/ मासे आहारात वापरलं जात आहे आणि वर्षाला दीड ते दोन टक्के वाढतही आहे. मांसाचं उत्पादन मात्र माणसाची ही अफाट भूक भागवण्याइतकं वाढत नाही. शहरीकरणामुळे चरण्यासाठी कुरणांची जमीन कमी पडते आहे. पाण्याची टंचाई कायमची आणि बेभरवशाची झाली आहे. त्यात प्राण्यांशी संबंधित रोग (मॅड काऊ डिसीज वगैरे); प्राण्यांमुळे होणारं कार्बन डाय ऑक्साईड प्रदूषण या सर्व समस्यांमुळे मासांची मागणी पूर्ण कशी करावी असा प्रश्न जगासमोर उभा राहणार आहे!

अशा वेळेस पुन्हा एकदा विज्ञान मदतीसाठी धावलं आहे. आधुनिक जीवतंत्रज्ञाचा आधार घेऊन 'मांसपेशींची वाढ प्रयोगशाळेत कठोर नियंत्रणाखाली करता येईल का?' असा विचार शास्त्रज्ञांच्या मनात आला आहे. बॅक्टेरीया, यीस्ट आणि वनस्पतींच्या पेशीं आणि टिशू कल्चर पासून तर मनुष्य पेशी आणि उतीचं उत्पादन प्रयोगशाळेत आणि कारखान्यात करण्याचं तंत्र आपण गेली कित्येक दशकं वापरतो आहोत. आता एक पाऊल पुढें टाकून खाण्यासाठी उपयुक्त, आरोग्यदायी, किफायतशीर आणि कार्यक्षम असं तंत्रज्ञान आता तयार झालं आहे.



कृत्रिम मांस बनवणाऱ्या कंपन्या त्यांना हव्या असलेल्या प्राण्यांच्या एका पेशी पासून सुरुवात करतात. पेशी निवडताना त्या पेशींची गुणवत्ता, म्हणजे प्रथिनाचा प्रकार, टक्केवारी, इतर रेणू, वाढीचा वेग, चव, वास, टणकपणा, शिजवायला लागणारा वेळ वगैरे सर्व पारखूनच पेशींची निवड केली जाते . उदा. मत्स्य जातीच्या पेशी निवडताना प्रयोगशाळेत बनवलेल्या पेशी-युतीची चव तुम्हाला हव्या त्या, म्हणजे पापलेट, सुरमई, कोळंबी, किंवा रोहू आणि सामान माशासारखीच लागेल, शिवाय ह्या पेशी सोडून इअर कोणत्याही पेशी किंवा अशुद्धता त्यात नाही ह्याची अचूक काळजी घेतली जाते. त्यानंतर, पेशींची वाढ होण्यासाठी आणि संख्या वाढण्यासाठी लागणाऱ्या रसायनांचं द्रावण बनवून त्यात ह्या पेशींची वाढ केली जाते. कारखान्यातल्या अचूक पद्धतींमुळे पेशी, खरे प्राणी, म्हणजे मासे, कोंबड्या, किंवा बकरी ज्या वेगाने वाढले असते, त्याहून अधिक वेगाने वाढतात आणि ठराविक वेळात माणसाचा गोळा (मींत्त्ले) तयार होतो. मग तो मूळ द्रावण पासून गाळून त्याला हवा तसा आकार दिला जातो, आणि हाताचा स्पर्शही न होता हे कृत्रिम माणसाचे उत्पादन दुकानात शीतपेटीत जाऊन बसते; मूळ प्राण्याचं आकर्षक चित्र, उत्पादनाचं लेबल वगैरे सर्व नीट लिहून. आधुनिक जीवतंत्रज्ञानाला असलेला एक मोठा विरोध म्हणजे जैविक बदल (जेनेटिक मॉडिफिकेशन) ह्या सर्व प्रक्रियेत वापरलं जात नाही; त्यामुळे ह्या उत्पादनाला त्या बाजूने ही विरोध संभवत नाही.



'कल्चर्ड मांस' ह्या नावाने ओळखले जाणारे हे उत्पादन बनवणाऱ्या अमेरिकेतील काही छोट्या कंपन्या आहेत; आणि प्रत्येक कंपनीने आपल्या उत्पादनाचे वैशिष्ट्य सुद्धा ठरवलं आहे. 'मोझा मीट', मेमफ़ीस मीट' ह्या कंपन्या प्राण्यांच्या माणसाचं कृत्रिम उत्पादन करताहेत. तर 'ब्लु नाईल' ह्या कंपनीने मास्यांचं मांस बनवलं आहे. मॅकडोनाल्ड, केएफसी सारख्या बर्गर कंपन्यांनी अशा कृत्रिम माणसाने बनवलेल्या बर्गरचं उत्पादन केलं तेव्हा तर त्याचं तीन दिवसात खपेल इतकं उत्पादन आठ तासातच संपून गेलं आणि ग्राहकांनी तर नेहमीचे खऱ्या प्राण्यांच्या मांसाचे बर्गर, सोया प्रथिन बनवलेले बर्गर, मश्रूम बर्गर आणि हे कृत्रिम बर्गर, ह्या सर्वात पहिला नंबर दिला तो कृत्रिम बर्गरना! चव अगदी नेहमीच्या बर्गरसारखी. खाताना तोंड-जीभ-दात यांना येणारा 'माउथफिल' अगदी हवा तसा'. उत्पादन कायम ताजं आणि किफायतशीर आणि निसर्गावर अवलंबून नसल्यामुळे हवं तेंव्हा हवं तेव्हढं ! रोगराईची चिंता नाही आणि प्राणीप्रेमी जनतासुद्धा खूष ! आणि मागणी म्हणाल तर अमर्याद ! ह्यामुळे नवा उद्योग सुरु करावयाचा असेल तर हे एक आकर्षक क्षेत्र ठरत आहे. गेल्या दोन वर्षात ह्या स्टार्टअप कंपन्यांच्या समभागांची किंमत वेगाने वर जात आहे आणि अन्नपदार्थ विकणाऱ्या मोठ्या कंपन्यांचं लक्ष ह्या कृत्रिम मांसाच्या उद्योगाकडे गेलं आहे!

मनुष्याच्या आधुनिक जीवनातील अनेक समस्या सोडवण्यात अज्ञानाचा महत्वाचा सहभाग आहे. आपल्या मूलभूत गरजा म्हणजे पाणी, अन्न आणि आरोग्य ह्यामध्ये आधुनिक जीवतंत्रज्ञानांचं महत्व आहे. अशी अनेक उदाहरणं आपण आगामी लेखामध्ये पाहणार आहोत.

ले. सद्गुरू कुळकर्णी, रसायन अभियांत्रिकी (युडीसिटी, मुंबई), रसायने, धातू, तेलं, जीव-तंत्रज्ञान आणि इतर अनेक उत्पादनाच्या संशोधनात चाळीस वर्षे अनुभव.

संपर्क: फोन. ९७०२०१०४७,
Sadguru.Kulkarni@gmail.com

# मनोरंजन विश्व

## प्लॅनेट मराठीचा भव्य शुभारंभ



जगभरातील मराठी प्रेक्षकांचे मनोरंजन करण्यासाठी आणि आपली मराठी कला आणि संस्कृती त्यांच्यापर्यंत पोचवण्यासाठी काही महिन्यांपूर्वी ' प्लॅनेट मराठी ' या पहिल्या मराठी ओटीटी व्यासपीठाची घोषणा करण्यात आली होती. या ' प्लॅनेट मराठी ' च्या कार्यालयाचा भव्य शुभारंभ सोहळा नुकताच साजरा करण्यात आला. पुष्कर श्रोत्री आणि आदित्य ओक यांची भागीदारी असणाऱ्या या ' प्लॅनेट मराठी ' चे सर्वेसर्वा अक्षय बर्दापूरकर आहेत. ते म्हणाले, ' देशातील आणि परदेशातील मराठी प्रेक्षक मराठी चित्रपटांच्या 'फर्स्ट डे फर्स्ट शो' चा अनुभव घरबसल्या घेऊ शकतील. मराठी आशयाला योग्य स्थान

मिळवून देण्यासाठी 'प्लॅनेट मराठी ' चा कायम प्रयत्न राहील. ' प्लॅनेट मराठी सोबत अनेक मराठी नावे जोडली गेली आहेत. अमित भंडारी, ऑस्कर ज्युरी उज्ज्वल निरगुडकर तसेच सिंगापूरमधील 'व्हिस्टास मिडिया कॅपिटल' या मनोरंजन कंपनीने सुद्धा 'प्लॅनेट मराठी ' सोबत काम करण्याची तयारी दाखवली आहे. या शुभारंभ सोहळ्याला सचिन पिळगावकर, मृणाल कुलकर्णी, अमृता खानविलकर, श्रुती मराठे, तेजस्विनी पंडित, आदिनाथ कोठारे, सोनाली खरे, सुव्रत जोशी आदी मान्यवर उपस्थित होते .

## गोदावरी




आपण अभिनय करता करता एखाद्या उत्तम मराठी चित्रपटाची निर्मिती करावी असे स्वप्न सुद्धा अनेक जण पाहत असतात आणि काहीजण ते स्वप्न प्रत्यक्षात देखील आणण्याचा प्रयत्न करतात. अभिनेता जितेंद्र जोशी याने देखील आता निर्मिती क्षेत्रात पदार्पण केले आहे. 'ब्लू ड्रॉप फिल्म्स' आणि 'जितेंद्र जोशी पिक्चर्स' यांनी 'गोदावरी' या मराठी चित्रपटाची निर्मिती केली आहे. पवन मालू, मिताली जोशी हे चित्रपटाचे निर्माते तर आकाश पेंढारकर, पराग मेहता हे सहनिर्माते आहेत. निखिल महाजन याने या चित्रपटाचे दिग्दर्शन केले आहे. कुटुंबातील नाती आणि वाहती नदी यांची सांगड घालण्यात आलेला 'गोदावरी' हा चित्रपट कसा असेल, ही उत्सुकता आपल्याला नक्कीच वाटत आहे. नाशिक मधील गोदावरी नदीच्या काठी वसलेल्या एका कुटुंबाच्या आणि त्या नदीच्या जिव्हाळ्याची गोष्ट आपल्याला ' गोदावरी ' चित्रपटातून पाहता येणार आहे. नुकताच या चित्रपटाचा टीजर प्रदर्शित झाला आहे आणि या महाराष्ट्र दिनाला हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे. ज्येष्ठ अभिनेते विक्रम गोखले, नीना कुळकर्णी, संजय मोने, जितेंद्र जोशी, गौरी नलावडे यांच्या या चित्रपटात प्रमुख भूमिका आहेत. चित्रपटाची कथा, पटकथा निखिल महाजन आणि प्राजक्त देशमुख यांची असून प्राजक्त देशमुख याने चित्रपटाचे संवाद लिहिले आहेत. जितेंद्र जोशी यानेच चित्रपटासाठी गीते लिहिली असून त्याला ए .व्ही . प्रफुल्लचंद्र यांचे संगीत आहे.

गणेश आचवल

९८२१२६८३९१



# ‘मन: चक्षु : 1 - Mr. & Mrs. बागुलबुवा’

‘आता झोप हं नाहीतर, मी बागुलबुवाला बोलवीन’ आईने हे अखेरच हत्यार उपसलं की मी घाबरून गपकन डोळे मिटून झोपायचा प्रयत्न करायचो. पण डोळे मिटले असले तरी माझ्या मन:चक्षुसमोर बागुलबुवा नाचायचा. कधी भयानक कुबड तर कधी मोठे मोठे सुळे तर कधी दोन्हीही डोळ्यांना रांजणवाडी झालेले लाल लाल डोळे गरागरा फिरतायेत. प्रत्येक वेळी वेगळे रूप. एकदा तर त्याच्या हातात गणिताच्या बाईंची पट्टी पण होती. असं वाटायचं एकदा तरी खरंच तो दिसू दे कसा आहे तो ? म्हणजे माझ्या मनाचा हा जुलूम तरी थांबेल. लहानपणी मन:चक्षु वगैरे कळत नसे. पण आता विचार केला की एक लक्षात येतं की खऱ्या डोळ्यांपेक्षा हे मन:चक्षुच आपले खरे वैरी असतात. माझ्या आजोळी झालेल्या गमतीवरून तर हे सिद्धच होतं.

झालं असं की प्रसंग तोच पण पात्र बदलली. ’ बघ हं, आता झोपला नाहीस तर बगुमावशीला बोलाविन. मग ती तुला तिच्या झोळीत घालून घेऊन जाईल. ’ आजीने धमकी दिली. आं !! आता ही बगुमावशी कोण ? ’ कळेल कळेल उद्या आली कि. हे असे सुळे, ह्या अश्या झिंज्या. ही मोठ्ठी झोळी. ’ अरेच्या, बागुलबुवापेक्षा हे कुणीतरी नवीनच आहे. काही डोळ्यासमोर येईच ना. खरं तर मावशी हा एक गोडच प्रकार असतो. त्यातून झोळी



तर मला फार आवडायची. झोळीच्या पाळण्यात झोपण्याची माझी लहानपणची सर्वात मोठी महत्वाकांक्षा होती. त्यामुळे जराही न घाबरता ‘बोलाव बगुमावशीला. जाईन मी तिच्या झोळीतून’ असं बिनधास्त उत्तर आजीला देऊन मी माझी मस्ती चालू ठेवली. ‘अवगलास हो. थांब तुझ्या आईलाच बोलावते’. आजी म्हणाली. ‘पण आजी बगुमावशी म्हणजे कोण ग ?’ माझी उत्सुकता मला गप्प बसू देईना. ‘अग त्याला बागुलबुवाची भीती घाल. बगुमावशी माहीत नाहीये त्याला’ तेव्हढ्यात आलेली आई आजीच्या कानात कुजबुजली. ‘बगुमावशी म्हणजे.. म्हणजे बागुलबुवाची बायको’ आजीला काहीही झालं, तरी मला आजोळची लोकल भीतीच घालायची होती बहुतेक. अरेच्या!!! म्हणजे श्री. बागुलबुवा !! बागुलबुवाला बायको आहे म्हणायची ! कधी झालं त्याचं लग्न ? कुठं होतं ? कोणता हॉल घेतला होता ? सगळी भूतचं आली होती का लग्नाला ? भटजी कोण ? भूतांत भटजी पण असतात ? जेवायला काय होतं ? गोगलगाईचा मसाले भात व वटवाघूळचं सूप ? (ऱ्द ण्दन्1’ रदव ग्हाहू) आणि मग रिसेप्शनला काय होतं ? श्री.ँ श्री. बागुलबुवांना मुले किती ? त्याचं बाळही झोळीच्या पाळण्यात झोपतं ? एक ना दोन. माझ्या प्रश्नांना उत्तर देता देता आई व आजीची हसून हसून मुरकुंडी वळली. बायका- मुलांत रमलेला वेगळाच कुटुंबवत्सल बागुलबुवा माझ्या मन:चक्षुसमोर आला आणि माझी भीती अजून कमी झाली. त्यात, एरवी वाघ, पण मामीला जरासे वचकून असणारे माझे सगळे मामा माझ्या डोळ्यासमोरच होते. त्यामुळे माझा बागुलबुवा, हा श्री. बगुमावशी बागुलबुवाला वचकूनच असणार याची मला खात्री होती. त्यामुळं बायको असलेला बागुलबुवा आता एकदम माणसातच आला. आणि शेवटी म्हणजे श्री. बागुलबुवा कितीही झालं तरी एक बाईच ना. तोपर्यंत स्त्री जातीचा माझा अनुभव खूपच गोड होता. ( 1आई, 2 आज्या, 2 मावश्या, 3 बहिणी, 7 माम्या व आते, मामे, चुलत धरून एकूण 2’ बहिणी). लग्न होईपर्यंत कोणत्याही बाईला न घाबरलेला, श्री. बागुलबुवाला कसली भीक घालतोय. एकंदरीतच त्या वर्षी आजोळहून मी बागुलबुवाच्या भीतीला काहीसं जिंकून मुंबईला परत आलो.

परत आल्या आल्या, टिळक मंदिराच्या व्यायाम शाळेत, पहिल्याच दिवशी माझी मैत्री एका मुलाशी झाली. अगदी गोड व नाजूक मुलगा . त्याचं आडनाव निघालं बागुल . झालं . श्री. बागुलबुवांची आणि त्याच्या

बाबतच्या माझ्या मन:चक्षुची सद्दी तिथचं संपली ती कायमची.

**प्रसाद आठल्ये**

९८२०६१३४४५

(अर्कचित्र - आर्द्रा आठल्ये)




# गुलमोहोर ट्रॅव्हल्स

आयोजित सहली

| | |
|---|---|
| १२ ते १४ फेब्रु. | - स्ट्रॉबेरी महोत्सव - महाबळेश्वर, प्रतापगड, भिलार,मॅप्रो |
| १६ ते २१ फेब्रु. | - हेरीटेज - हंपी, बदामी, विजापूर, पट्टडकल, ऐहोळे, शाकंबरी मंदीर |
| २७ ते २८ फेब्रु. | - हेरीटेज- नाशिक, स्वा.सावरकर जन्मस्थान, मिनरल, आर्टिलरी म्युझियम |
| १२ ते १४ मार्च | - जंगल सफारी - ( विमानप्रवास )कान्हा,पेंच,अभयारण्य,रामटेक |
| २८ ते २९ मार्च | - होळी निमित्त बोर्ली पंचतन, दिवेआगर, हरीहरेश्वर, वेळास बीच |
| ०९ ते ११ एप्रिल | - आम्रमहोत्सव ( रेल्वेने ) मालवण, तारकर्ली, देवबाग, त्सुनामी आयलँड,वेतोबा, |
| १६ ते १८ एप्रिल | - काजूमहोत्सव ( विमानप्रवास ) गोवा, तांबडी सुर्ल, चोरला घाट, नेचर नेस्ट |
| २३ ते २५ एप्रिल | - आम्रमहोत्सव (रेल्वेने) देवगड, कुणकेश्वर,विजयदुर्ग, आडीवरे,कनकादित्य |
| ०१ ते ०२ मे | - आम्रमहोत्सव तांबडी अष्टमी, मधुबन ॲग्रीटेनमेंट, रोहा, पाली गणपती |

अधिक माहिती व बुकींगसाठी संपर्क

सुबोध जोशी - 9769008775 सचिन जोशी - 9869376515

www.gulmohortravels.com